महासत्ता

## थोडक्यात



# न्यू इंग्लिश स्कूलमध्ये सायबर सुरक्षा कार्यशाळा संपन्न

मुरगूड,ता.१३(प्रतिनिधी)–

**आजच्या डिजिटल युगात सायबर सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर आणि क्विक हील फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमांतर्गत न्यू इंग्लिश स्कूल सदाशिवनगर हमिदवाडा येथे सायबर सुरक्षाबाबत सविस्तर कार्यशाळा संपन्न झाली.**

या उपक्रमाअंतर्गत देवचंद महाविद्यालयातील सायबर वॉरियर्स रुद्र सुतार आणि प्राजक्ता खवरे यांनी न्यू इंग्लिश स्कूल सदाशिवनगर हमीदवाडा येथे विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा, ऑनलाईन फसवणूक, फिशिंग लिंक, मजबूत पासवर्ड, सोशल मीडिया सुरक्षितता,ओटीपी व बँकिंग माहितीची गोपनीयता, सायबर गुन्ह्यांपासून बचाव आणि सायबर तक्रार नोंदविण्याच्या पद्धती याबाबत मार्गदर्शन केले.यावेळी न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य डी.एम.सागर, डी. जी. निकम, एम.बी.साळुंखे, ए.पी.देवडकर, सौ.अर्चना पाटील, सौरभ पाटील, बी.एस.सातपुते, व्ही.एस.पाटील, मच्छिंद्र खतकर, विलास गुरव, महादेव ढेंगे आदिसह विद्यार्थी,विद्यार्थिनी उपस्थित होते.